# Government Of Maharashtra

महाराष्ट्र शासन

Office of the Joint Director of Industries, Mumbai Metropolitan Region, Mumbai

उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, मुंबई यांचे कार्यालय,

Vikas Centre, 702, 7th Floor, Dr. C.G.Marg, Near Basant Cinema, Chembur (East), Mumbai. 400074.

विकास सेंटर, ७०२, ७ वा मजला, डॉ. सी.जी.मार्ग, बसंत सिनेमागृहाजवळ, चेंबूर (पूर्व), मुंबई. ४०००७४.

Tel.No. 25206199/25208182

Email: didic.mumbai@maharashtra.gov.in


दिनांक :- २३.०३.२०२३.

## :- मुंबई शहर निर्यात प्रचालन कार्यबल समितीची बैठक दिनांक ०८.०३.२०२३ चे इतिवृत्त -:

मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा निर्यात प्रचालन समिती गठीत करण्याबाबत, शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक निप्रप-२०२०/प्र.क्र. २८/ उद्योग-७, दिनांक १९.१०.२०२० मध्ये निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार मुंबई शहरकरिता निर्यात प्रचालन समितीची स्थापना करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांची मान्यत घेऊन तसे समिती सदस्य यांना कळविण्यात आले आहे. राज्यातील निर्यातीला चालना देण्याच्या दृष्टीने व उद्योजकांना येणा-या अडचणीचे निराकरण करण्याकरिता तसेच जिल्हयाती निर्यातवाढीसाठी विविध केंद्र व जिल्हा कार्यालये, औद्योगिक संघटना, निर्यात परिषदा, निर्यात सल्लागार इ. यांच्याशी सातत्याने पाठपुरावा, समन्वय व अडीअडचणी दूर करण्याच्या दृष्टीने जिल्हा निर्यात प्रचालन परिषदेस सहाय्य करण्यासाठी एक जिल्हा एक उत्पादन आणि निर्यात प्रोत्साहनाकरिता मुंबई शहराकरिता उपक्रम राबविण्याबाबत जिल्हा निर्यात प्रचालन कार्यबल समितीची बैठक मा उपजिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०८.०३.२०२३ रोजी दुपारी ०४.३० वाजता मा. जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय, जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१. येथे संपन्न झाली.

१. सर्वप्रथम सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती यांनी बैठकीस उपस्थितांचे स्वागत करुन निर्यात प्रचालन समिती संदर्भात मुंबई शहरजिल्हयाकरिता स्थापन करण्यात आलेल्या निर्यात प्रचालन समिती अंतर्गत करण्यात येणा-या कार्यवाहीबाबत एक जिल्हा एक उत्पादन आणि निर्यात प्रोत्साहनाकरिता मुंबई शहराकरिता उपक्रम राबविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रस्तावित निर्यात प्रचालन कृती आराखडाबाबत बदल अथवा सूचना तसेच निर्यातसंबंधी काही अडचणी असल्यास त्याबाबत कळविण्याबाबत निर्देश दिले.

२. बैठकीसाठी उपस्थित प्रतिनिधी यांनी विषयासंदर्भात खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केले.

15

| क्रमांक | प्रतिनिधी | उपस्थित केलेले मुद्दे |
|---|---|---|
| १. | मा. जिल्हा अग्रणी व्यवस्थापक, बँक ऑफ इंडिया, | जिल्हा अग्रणी व्यवस्थापक यांनी मा सदस्य सचिव यांचेसोबत Flated Industrial Gala Policy, MSME Policy, Scrap Policy, Ties Policy, Export Award and GI Mapping of ODOP Product या विषयावर चर्चा करुन त्याबाबत योग्य ते सहकार्य करण्याबाबत मान्य केले. |
| २. | संचालक, लेदर एक्सपोर्ट कौन्सिल, | लेदर उद्योगाच्या निर्यातवाढीसाठी, क्षमतावृध्दीसाठी प्रयत्न करण्याबाबत तसेच निर्यातीबाबत प्रदर्शन भरविण्याबाबत व त्याकरिता जागा उपलब्ध करुन देण्याबबात सुचविण्यात आले. त्याबाबत काही अडचणी असल्यास तसे या कार्यालय लेखी कळविण्याबाबत सांगण्यात आले. निर्यातपद्धती बाबत नवीनतम तंत्रज्ञान व कौशल्ये तयार करुन त्याकरिता समिती सदस्य यांनी चर्चासत्र तसेच प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करुन निर्यातवाढीकरिता प्रयत्न करण्याबाबत सुचविण्यात आले. |
| ३. | सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मुंबई उपनगर, फोर्ट, मुंबई. ४००००१. | जेम्स अँड ज्वेलरीकरिता झवेरीबाजार येथे मनुष्यबळ क्षमता कमी असल्याने औद्योगिक समूह (Cluster), B२B प्रदर्शने भरविणे, Credit Link Capital Subcidy Scheme योजनेचा लाभ मिळण्याबाबत विनंती उपस्थित प्रतिनिधी यांनी केली |
| ४. | सचिव, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर | निर्यातदार यांना निर्यातीकरिता येणा-या अडचणीबाबत जिल्हा वस्तू व सेवाकर कार्यालय यांचेकडून निराकरण करणे, तसेच निर्यातदारांकरिता NSIC योजनेबाबतचे सादरीकरण करण्याबाबत सुचविण्यात आले. तसेच एक जिल्हा एक उत्पादनाकरिता मुंबई एअरपोर्ट, शासकिय कार्यालय, बस डेपो इतर महत्वाच्या ठिकाणी राज्यातून उत्पादन होणा-या वस्तूंचे प्रदर्शन भरविणे. |
| ५. | संचालक, ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रिज, न्यु एक्सेलसियर बिल्डींग, ६ वा मजला, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई. ०१ | मुंबईला जागतिक स्तरावर युनिकॉर्नची गरज असल्याने शासनाने स्टार्टअप्समध्ये मार्गदर्शन केल्यास उत्पादनांच्या तुलनेत प्रचंड महसूल शासनास प्राप्त होईल. शासनाने एक जिल्हा एक उत्पादन सोबत एक जिल्हा एक सेवा संकल्पना विकसित केल्यास संस्थेच्या इनपूटसह सहभागी होणार असल्याचे नमूद केले आहे. तसेच किनारपटटीच्या भागातील वाहतूकीस चालना देण्यासाठी प्रोत्साहीत केल्यास वेळ तसेच इंधनाची बचत होऊन वाहतूकीस वेग मिळणार असल्याचे नमूद केले आहे. तसेच एमएसएमई अंतर्गत काम करणा-या अकुशल कामगारांसाठी अद्ययावत कौशल्य तयार करण्याबाबत तसेच त्यासंदर्भात कौशल्य विभागाच्या महाराष्ट्र नोडल एजन्सीला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे नमूद केले आहे. बंद पडलेल्या तसेच आजारी उद्योगांना पुनरुज्जीवीत करुन आर्थिक समावेशन प्रणाली सुधारण्याबाबत नमूद केले आहे. महाराष्ट्रातील निर्यातदारांना प्रोत्साहन देण्याकरिता तसेच जागरुकता आणण्याकरिता पारंपारिक उत्पादने प्रदर्शित करण्याकरिता संयुक्त कार्यक्रम आयोजित करण्याबाबत नमूद करण्यात आले आहे. |
| ६. | संचालक, बेसिक केमिकल्स, कॉस्मेटिक्स अँड डायस एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिल, झांसी कास्लेट, ४ था मजला, ७-कूपरेज रोड, मुंबई. ४००००१. | जिल्हयातील निर्यातदारांकरिता शासनाकडून संमेलन तसेच प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे. तसेच एक जिल्हा एक उत्पादन संकल्पनेकरिता केमिकल घटकाचा विचार करण्याबाबत नमूद केले आहे. याबाबत उत्पादक व उत्पादन यांची यादी देण्याबाबत नमूद केले आहे. तसेच तसेच निर्यातीकरिता कंटेनर उपलब्ध होत नसल्याने याबाबत शिपींग कार्पोरेशन यांची मदत होणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. |

| | | |
|---|---|---|
| ७. | संचालक, प्लास्टिक निर्यात प्रोत्साहन परिषद, युनिट क्रमांक ००२, राजवंश बिझनेस पार्क, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई. ४०००५९. | प्लास्टिक निर्यात प्रोत्साहन परिषद यांनी पूर्वीच्या बैठकीमध्ये नमूद केल्याप्रमाणे तसेच एक जिल्हा एक उत्पादन करिता प्लास्टीक क्षेत्रांतर्गत येणा-या जास्तीत जास्त एमएसएमई उद्योजकांचा विचार होण्याबाबत तसेच मुंबईकरिता जास्तीत जास्त उत्पादन करणारे उद्योजक यांचा विचार होण्याबाबत विनंती करण्यात आली. तसेच निर्यात उद्योजक यांना त्यांच्या व्यवसायात मुंतवणूक होण्याकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले. |
| ८. | लेदर गुड मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन, संत रोहीदास मार्ग, ओएनजीसी, धारावी, मुंबई. १७. | लेदरबाबत बनविण्यात येणारी सर्व उत्पादने ही हस्तनिर्मित असल्याने तसेच यंत्रसामुग्रीचा अभाव असल्याने व्यवसाय वाढविण्याकरिता शासनामार्फत काही मदत असल्यास देण्याबाबत विनंती करण्यात आली. |
| ९. | वरिष्ठ प्रकल्प सल्लागार, अर्न्स्ट अँड यंग एलएलपी, ५ वा मजला, ब्लॉक बी, निरलॉन नॉलेज पार्क, गोरेगांव, मुंबई. ४०००६३. | एक जिल्हा एक उत्पादन करिता तसेच निर्यात प्रोत्साहनाकरिता उपस्थित असलेल्या सर्व संस्था यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने करण्यात येणा-या कार्यवाही होण्याकरिता त्यानुसार कृती आराखडयमध्ये बदल करणे. |

मुंबई शहराकरिता प्रस्तावित निर्यात प्रचालन समिती बैठकीमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने कार्यवाही होण्याकरिता मा. उपजिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी एक जिल्हा एक उत्पादन आणि निर्यात प्रोत्साहनाकरिता मुंबई शहराकरिता उपक्रम राबविण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच सदर समिती अंतर्गत निर्यातीसंदर्भात बैठकीस उपस्थित असलेल्या संस्थेस तसेच इतर अन्य संस्थेस काही अडचणी असल्यास त्याचे निराकरण करणे व त्याबाबत लेखी स्वरुपात माहिती उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, मुंबई कार्यालयास सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

सभेअंती सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांचे परवानगीने बैठक संपन्न झाल्याचे जाहिर करण्यात आले.

उद्योग उप संचालक (मुंप्रावि) तथा
सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती

मा. उपजिल्हाधिकारी, मुंबई शहर तथा अध्यक्ष
जिल्हा निर्यात प्रचालन समिती

* <u>बैठकीस उपस्थित कार्यबल समिती सदस्य :-</u>

| | |
|---|---|
| १. | मा. उप जिल्हाधिकारी, मुंबई शहर, मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर तथा अध्यक्ष जिल्हा निर्यात प्रचालन समिती, मुंबई शहर, मुंबई. |
| २. | उद्योग उप संचालक (मुंप्रावि) तथा सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती, मुंबई शहर, मुंबई. |
| ३. | जिल्हा अग्रणी व्यवस्थापक, बँक ऑफ इंडिया,बँक ऑफ इंडिया बिल्डिंग, २ रा मजला, नटराज मार्केटसमोर, एस.व्ही.रोड, मालाड (पश्चिम), मुंबई. |
| ४. | संचालक, ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रिज, न्यु एक्सेलसियर बिल्डींग, ६ वा मजला, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई. |
| ५. | सचिव, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर, ओरीकन हाऊस, ६ वा मजला, ४ दुभाष रोड, फोर्ट, मुंबई. |
| ६. | संचालक, बेसिक केमिकल्स, कॉस्मेटिक्स अँड डायस एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिल, झांसी कास्लेट, ४ था मजला, ७-कूपरेज रोड, मुंबई. |
| ७. | लेदर इंडस्ट्रिज डेव्हलपमेंट कार्पोरेशन, ४५, ५ वा मजला, बॉम्बे लाईफ बिल्डींग, वीर नरीमन रोड, फोर्ट, मुंबई. |
| ८. | सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मुंबई उपनगर, फोर्ट, मुंबई. |
| ९. | वरिष्ठ प्रकल्प सल्लागार, अर्न्स्ट अँड यंग एलएलपी, ५ वा मजला, ब्लॉक बी, निरलॉन नॉलेज पार्क, गोरेगांव, मुंबई. |
| १०. | संचालक, लेदर एक्सपोर्ट कौन्सिल, प्लॉट क्रमांक ए-४१, विनमार हाऊस, एस.एफ.रोड क्रमांक २, एमआयडीसी, अंधेरी (पूर्व), मुंबई. |
| ११. | लेदर गुड मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन, संत रोहीदास मार्ग, ओएनजीसी, धारावी, मुंबई. |
| १२. | संचालक, प्लास्टिक निर्यात प्रोत्साहन परिषद, युनिट क्रमांक ००२, राजवंश बिझनेस पार्क, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई. |

क्रमांक उससं/मुंप्रावि//मुंबई शहर/जिनिप्रस/बैठक/२०२३/२६८ दिनांक :- ३/३/२०२३

प्रत माहितीस्तव सादर :-

१. मा जिल्हाधिकारी, मुंबई शहर
२. बैठकीस उपस्थित कार्यबल समिती सदस्य, मुंबई शहर.

19